# <u>प्रेसनोट</u>

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १३/०६/२०२६

तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे आजरोजी दि १३/०६/२०२६ रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, आरोपी लोकसेवक जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, अमरावती श्री विराग आनंदराव देशमुख, यांनी तक्रारदार यांचे कृषी केंद्रातील विवीध कंपनीच्या खताचे नमुने तपासणीकरीता न घेण्याकरीता, तपासणी करीता घेतलेल्या नमुने तपासणी करीता न पाठविण्याकरीता ७०,००० रु ची लाच मागणी केली असल्याने त्यांना लोकसेवक श्री विराग देशमुख यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी बाबत तक्रार दिली होती.

सदर तक्रारी अर्जाचे अनुशंगाने सापळा अधिकारी यांनी आज दि. १३/०६/२०२६ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री विराग आनंदराव देशमुख यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष तक्रारदार यांचे कृषी केद्रांतुन घेतलेलया खतांच्या दोन नमुन्याकरीता प्रत्येकी २०,००० रु प्रमाणे ४०,००० रु आणी तक्रारदार यांचे कृषी केंद्रातील इतर दोन कंपनीच्या खताचे नमुने न घेण्याकरीता प्रत्येकी १५,००० रु प्रमाणे ३०,००० रु असे ७०,००० रु ची मागणी केल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले. सापळा कार्यवाहीदरम्यान तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष आलोसे विराग देशमुख यांनी त्यांचे खाजगी वाहनात ७०,००० रु लाच रक्कम स्वीकारतांना रंगेहात मिळुन आले. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेवर गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली,पर्यवेक्षण अधिकारी व सापळा अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. अमरावती, पोलीस निरीक्षक रविंद्र सहारे, पोलीस अंमलदार वैभव जायले, दत्ता वानखेडे, यांनी पार पाडली.

अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयातील सर्व नागरीकास आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांचे वतीने खाजगी इसम यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर शुल्का व्यतिरीक्त लाचेची मागणी केली असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे संपर्क साधावा. तक्रारदाराचे तक्रारीवर तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

<u>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा.</u>

१) मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र
मो.क्र.९०११३२३४२६
२)श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र
मो.क्र.९७६४२१०४८५
३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती
मो.क्र.९८२३१११५५,७५१७५७१०६४
४) ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं.
०७२१-२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर-१०६४

**(सुनिल कीनगे)**
**पोलीस उपअधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती**